-: प्रेसनोट दिनांक- २३/०८/२०२३ :-

**आरोपी लोकसेवक १) अजित उध्दव सुर्यवंशी, अध्यक्ष, संजीवनी शिक्षण प्रसारक मंडळ संकलित आण्णासाहेब विभुते विदयामंदीर प्राथमिक शाळा, धरणगुत्ती, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर रा. फ्लॅट क्र.१ व २, ५ वा मजला, धनराज वसाहत अपार्टमेंट, राजवाडा, सांगली, मुळ रा.पारा, ता.विटा, जि. सांगली २) महावीर आप्पासाहेब पाटील, वय ५७ वर्षे, मुख्याध्यापक, आण्णासाहेब विभुते विदयामंदीर, धरणगुत्ती, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर ३) अनिल बाळासो टकले, वय ५१, शिपाई, आण्णासाहेब विभुते विदयामंदीर, धरणगुत्ती, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर, रा. २/७१९, नदीवेश, राममंदिर जवळ, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

आण्णासाहेब विभुते विदयामंदीर शाळेचे संस्था अध्यक्ष अजित उध्दव सुर्यवंशी हे इमारत भाडयापोटी तक्रारदार यांच्याकडे माहे एप्रिल २०२३ च्या वेतनाची (९५,५७७/-रू. इतके) रक्कम लाच म्हणुन मागणी करून तक्रारदार यांचेकडे सदरची लाच ही दोन हप्त्यामध्ये देणेबाबत सांगितले. तक्रारदार यांनी सदरची रक्कम न दिल्याने तक्रारदार यांची वेतनवाढ रोखण्याबाबत वरिष्ठ कार्यालयास पत्रव्यवहार करून तक्रारदार यांच्यावर दबाव निर्माण करून वेतनवाढ रोखण्याची भीती दिली. तरी तक्रारदार यांना संस्था अध्यक्ष अजित सुर्यवंशी व मुख्याध्यापक महावीर पाटील यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दि.१७/७/२०२३ रोजी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रारअर्ज दिला होता.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीप्रमाणे दिनांक १७/०७/२०२३ रोजी लाच मागणीची पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आरोपी नंबर ०२ मुख्याध्यापक महावीर पाटील यांनी संस्था भाडेपोटी संस्था अध्यक्ष सुर्यवंशी यांचेकरीता माहे एप्रिल २०२३ च्या वेतनाइतकी लाच रक्कमेची मागणी केली. त्यानंतर दि.१५/०८/२०२३ रोजी तक्रारदार यांच्या तक्रारीप्रमाणे संस्था अध्यक्ष अजित सुर्यवंशी यांच्याकडे देखील पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे संस्थेच्या भाडयापोटी माहे एप्रिल २०२३ च्या पगाराइतकी रक्कम मुख्याध्यापक पाटील यांच्याकडे देण्यास सांगितलेचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाले.

आज दि.२३/०८/२०२३ रोजी सदर लाच मागणीच्या अनुषंगाने सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडे आरोपी क्र.१ संस्था अध्यक्ष अजित सुर्यवंशी यांनी मागणी केलेल्या लाच रक्कमेपैकी पहिला हप्ता म्हणुन ४५,०००/-रू. लाच रक्कम तक्रारदार हया मुख्याध्यापक महावीर पाटील (आरोपी क्र.०२) यांच्याकडे देण्यास गेल्या असता त्यांनी सदरची लाच रक्कम शाळेचे शिपाई अनिल बाळासो टकले (आरोपी क्र.०३) यांचेकडे देण्यास सांगितल्यामुळे तक्रारदार यांनी सदरची लाच रक्कम ४५,०००/- रूपये शाळेचे शिपाई अनिल बाळासो टकले यांचेकडे दिली असता त्यांनी लांच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले.

सदरबाबत १) अजित उध्दव सुर्यवंशी. (संस्था अध्यक्ष) आण्णासाहेब विभुते विदयामंदीर, धरणगुत्ती, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर), २) महावीर आप्पासाहेब पाटील. (मुख्याध्यापक) वर नमुद संस्था ३) अनिल बाळासो टकले. (शिपाई ) वर नमुद संस्था यांचेविरूध्द जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्रीमती शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, श्री. संजीव बंबरगेकर, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, श्री प्रकाश भंडारे, सहायक फौजदार, पोहेकॉ/विकास माने, पोहेकॉ/सुनिल घोसाळकर, पोना/सचिन पाटील, पो.कॉ.मयुर देसाई, पो.कॉ. रूपेश माने, पो.कॉ.संदीप पवार, मपोकॉ/ पुनम पाटील, चा.पो.हे.कॉ. सुरज अपराध, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, कोणताही लोकसेवक सरकारी फी व्यतिरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास न घाबरता तक्रार दयावी तसेच अपसंपदेबाबत किंवा लाचेच्या अन्य तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- (०२०/२६१२२१३४)**
**( ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३)**
**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५**
**कार्यालय दुरध्वनी कमांक - (०२३१/२५४०९८९)**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**

Scanned by CamScanner